
31 AUG 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर सुधीर गाडगीळ यांची नियुक्ती

लोकमत प्रतिनिधी



**सांगली :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य म्हणून आमदार सुधीर गाडगीळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही नियुक्ती केली आहे. आमदार गाडगीळ यांचे या नियुक्तीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर नामनिर्देशित सदस्य म्हणून विधानसभेच्या एका सदस्याची नेमणूक केली जाते. त्यानुसार आमदार गाडगीळ यांची अध्यक्ष नार्वेकर यांनी नियुक्ती केली आहे. नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त करून आमदार गाडगीळ म्हणाले, की महान शैक्षणिक परंपरा असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचा सदस्य म्हणून काम करण्याची मला विधानसभेचे अध्यक्ष नार्वेकर यांनी संधी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ क्षेत्र, तसेच सांगली जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाच्या आणि प्रगतीच्या दृष्टीने मी अधिसभेचा सदस्य म्हणून सकारात्मक प्रयत्न करीन. शैक्षणिक क्षेत्रातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीन.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 AUG 2025

पुढारी

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## समक्ष मुलाखत (Walk in Interview)

जाहिरात क्र.०३/२०२५

शिवाजी विद्यापीठ कार्यालयात ११ महिन्याच्या हंगामी कालावधीकरिता खालील पदे (रोजंदारी/एकत्रीत मानधनावरील) भरण्यासाठी उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येणार आहे. तेव्हा पात्र उमेदवारांनी मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे अर्ज करून अर्जासह व आपल्या मूळ कागदपत्रांसह व झेरॉक्सप्रतींसह खाली नमूद केलेल्या दिनांकास समक्ष मुलाखतीसाठी स्व:खर्चाने सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|
| | | दि.०९.०९.२०२५ | |
| १. | कौशल्य विकास अधिकारी पदसंख्या–०१ | Good Academic record with 55% Marks at PG level and minimum 2 (two) years experience skill may be considered. Computer knowledge – MS Office, Power point, social Media users preferred Fluent in English Communication and soft skills **(For more detail refer our 'www.unishivaji.ac.in' website)** | एकत्रित मानधन दरमाह रू.२१,६००/– |
| २. | अस्थायी कनिष्ठ अभियंता (विद्युत) | B.E. (Electrical) with three years actual experience in HT & LT Installation or Diploma in Electrical Engg. from M.S.B.T.E. with 05 years actual construction experience in HT & LT Installation | एकत्रित मानधन दरमाह रू.१५,०००/– |
| ३. | रोजंदारी सुरक्षा पर्यवेक्षक | जे. सी. ओ. Junior Commissioned Officer) | प्रतीदिन रू.६२२/– |
| ४. | रोजंदारी सुरक्षा रक्षक | Ex-serviceman or persons belonging to Para-military force, Home-guards/SRP **(Ex-serviceman will be preferred)** | प्रतीदिन रू.४९५/– |
| ५ | रोजंदारी तारतंत्री | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण | प्रतीदिन रू.४५०/– |
| ६ | रोजंदारी अस्थायी मॉन्टेसरी टिचर | एक वर्षाचा बालवाडी शिक्षिका कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व पाळणाघराचे प्रशिक्षण असणे आवश्यक | प्रतीदिन रू.४००/– |
| ७ | रोजंदारी अस्थायी आया/ शिपाई (पाळणाघरसाठी) | आरोग्य सहाय्यक कोर्स पूर्ण करणाऱ्यांना अथवा मान्यताप्राप्त रूग्णालयातील आया/शिपाई अथवा तत्सम पदाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य | प्रतीदिन रू.३५०/– |
| ८ | रोजंदारी ग्रंथालय सहायक | Essential – 1) Any Graduate 2) Pass out M.Lib. & Inf. Sci. Course Desirable – 1) Fair Computer Knowledge (MS-CIT/Certificate/Diploma in Computer) 2) Two years of work experience in academic library | प्रतीदिन रू.४००/– |
| | | दि.१०.०९.२०२५ | |
| ९. | रोजंदारी कनिष्ठ लेखनिक | पदवीधर व संगणकाचे ज्ञान आवश्यक (शासनमान्य इंग्रजी व मराठी टंकलेखनाचे ज्ञान आवश्यक) | प्रतीदिन रू.४००/– |
| १०. | रोजंदारी महिला नाईट वॉर्डन | किमान १२ वी उत्तीर्ण, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असल्यास प्राधान्य तसेच चांगल्या वर्तणुकीचा दाखला आवश्यक | प्रतीदिन रू.४००/– |
| ११. | रोजंदारी पुरूष नाईट वॉर्डन | किमान १२ वी उत्तीर्ण, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असल्यास प्राधान्य तसेच चांगल्या वर्तणुकीचा दाखला आवश्यक | प्रतीदिन रू.४००/– |
| १२. | रोजंदारी वाहनचालक | किमान ८ वी उत्तीर्ण, जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना व अनुभव आवश्यक | प्रतीदिन रू.४५०/– |
| १३. | रोजंदारी ट्रॅक्टर चालक | किमान ८ वी उत्तीर्ण ट्रॅक्टर व ट्रॉली चालविण्याचा परवाना आवश्यक | प्रतीदिन रू.४५०/– |
| १४. | रोजंदारी पंप ऑपरेटर | आय.टी.आय पंपचालक प्रमाणपत्रधारक/संबंधित क्षेत्रातील १ वर्षाचा अनुभव | प्रतीदिन रू.४५०/. |
| १५. | रोजंदारी नळ कारागीर | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण किंवा नळ कारागीर कामाचा १ वर्षे अनुभव | प्रतीदिन रू.४५०/– |
| | | दि.११.०९.२०२५ | |
| १६. | अस्थायी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | B.E. (Civil) with three years actual construction experience or Diploma in Civil Engg. from M.S.B.T.E. with 05 years actual construction experience | एकत्रित मानधन दरमहा रू.१५,०००/– |
| १७. | रोजंदारी गवंडी | आय.टी.आय बिल्डींग कन्स्ट्रक्शन कोर्स उत्तीर्ण किंवा गवंडी कामाचा १ वर्षे अनुभव | प्रतीदिन रू.४५०/– |
| १८. | रोजंदारी सुतार | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण किंवा सुतार कामाचा १ वर्षे अनुभव | प्रतीदिन रू.४५०/– |
| १९. | रोजंदारी प्रयोगशाळा सहायक | Any Diploma from M.S.B.T.E. or B.Sc. व संगणक ज्ञान आवश्यक | प्रतीदिन रू.४००/– |
| २०. | रोजंदारी कुली | ७ वी पास, स्वच्छक कामाचा अनुभव अथवा तयारी असल्यास प्राधान्य | प्रतीदिन रू.४००/– |
| २१. | रोजंदारी शिपाई | ७ वी पास | प्रतीदिन रू.३५०/– |

१. वयोमर्यादा :– उपरोक्त अ.क्र. ४ सुरक्षा रक्षक पदासाठी उमेदवाराची किमान वयोमर्यादा २५ वर्षे व कमाल ६० वर्षे राहील. अ.क्र.१० व ११ नाईट वॉर्डन पदाकरीता किमान वयोमर्यादा ४० वर्षे व कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. उर्वरीत सर्व पदांकरिता खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे वयोमर्यादा राहील व राखीव उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. सदर किमान व कमाल वयोमर्यादा मुलाखती दिवशी सापेक्ष समजण्यात येईल.

२. उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद अ.क्र. २ ते २१ पदांमधील पात्र उमेदवारांना नियमानुसार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील.

३. उपरोक्त सर्व पदे ११ महिन्याकरिता हंगामी पध्दतीने तात्पुरत्या कालावधीकरिता भरावयाची असल्यामुळे, या पदांसाठी कायमस्वरूपी पदाप्रमाणे कोणतेही फायदे मिळणार नाहीत. तसेच सदर पदावर काम केल्यामुळे विद्यापीठाच्या नियमित सेवेतील कोणत्याही पदावर हक्क संबंध अथवा अधिकार राहणार नाही.

४. उपरोक्त समक्ष मुलाखतीअंती निवड झालेल्या उमेदवारांना, संबंधीत पदावरील सध्या विद्यापीठाकडील उपलब्ध प्रतिक्षा यादी संपलेनंतरच आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देणेत येतील, याची नोंद घ्यावी.

५. सदर पदासाठीचे अर्ज मुलाखती दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंतच स्वीकारले जातील. त्यानंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**मुलाखतीचे ठिकाण :** मानव्यशास्त्र इमारत (Humanities Building), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी वि/आस्थापना–१
दिनांक: ३१/०८/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव